**श्री.संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती, संगमनेर जि.प.अहिल्यानगर यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिकारी यांची नेमणूक करणेबाबत.**

**अहिल्यानगर जिल्हा परिषद**
**अर्थ विभाग**
**आदेश क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/३५६/२०२६**
**अहिल्यानगर दिनांक १८/१० /२०२६**

**वाचा** -१.मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/०२/२०२५ दिनांक ०७/०१/२०२५

२.मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर यांचेकडील सुधारित आदेश जा.क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/१०/२०२५ दिनांक ०९/०१/२०२५

३.चौकशी समिती अहवाल सादर दिनांक १६/०५/२०२५ व सुधारित चौकशी समिती अहवाल सादर दिनांक ३०/०९/२०२५

४.इकडील ज्ञापन/दोषारोप पत्र क्रमांक अर्थ/कार्या-१/आस्था-१/१६७/२०२६ दिनांक २०/०५/२०२६

५.गट विकास अधिकारी, पंचायत समिती संगमनेर, जि.प. अहिल्यानगर यांचेकडील पत्र क्रमांक आस्था-१/७०८/२०२६ दिनांक २५/०६/२०२६ अन्वये सादर केलेला श्री. घुले यांचा खुलासा

६.महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६(३) व (५) नुसार

पंचायत समिती अकोले,जिल्हा परिषद अहिल्यानगर या कार्यालयाचे स्तरावर आर्थिक अनियमितता झालेचे प्रथम दर्शनी निदर्शनास आलेनंतर संशयित अपहार प्रकरणी संदर्भ क्रमांक १ अन्वये चौकशी समिती व संदर्भ क्रमाक २ अन्वये सुधारित आदेशान्वये चौकशी समिती नियुक्त करून पंचायत समिती कार्यालय अकोले,अधिनस्त सन २०१९-२० ते सन २०२३-२४ या कालावधीतील वेतन विषयक देयके, सेवा निवृत्ती वेतन व प्राथमिक आरोग्य केंद्राकडील देयके नियमानुसार अदा करणेत आले किंवा कसे ? याबाबतची सखोल चौकशी करण्याबाबत चौकशी पथकास आदेशित करण्यात आले होते व त्याप्रमाणे संबधित गठीत समितीने प्रस्तुत चौकशी अहवाल संदर्भ क्रमाक ३ अन्वये कार्यालयास सादर केलेला आहे. त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी अकोले तालुक्यातील ११ प्राथमिक आरोग्य केंद्रे व तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाकडील दप्तर तपासणी कामी उपलब्ध करून देणेत आलेले होते.उपरोक्त कार्यालयांची दप्तर तपासणी केली असता प्राथमिक आरोग्य केंद्र ब्राम्हणवाडा,मवेशी व शेंडी यांनी सादर केलेल्या सेवार्थ देयकात दुबार देयके सादर करणे व अदा करणे,मुदत बाह्य झालेली देयके अदा करणे, बँकेचे नावे धनादेश तयार करुन बँक यादी मध्ये फेरफार करून स्वतःचे नावे/खातेवर रक्कम वर्ग करणे, बँक पत्रावर संवितरण अधिकारी याचे ऐवजी करिता म्हणून स्वाक्षरी करणे, मुळ प्रमाणकासोबत आवश्यक परिपूर्ण पूरक सहपत्रे, दस्ताऐवज जोडलेले नसणे, काही निवृती वेतनधारकांस, निवृत्ती नंतरचे अधिकच्या कालावधीचा फरक अदा करणे, कॅशबुक/रोखवही लिहितांना प्रमाणकाबाबत परिपूर्ण माहिती न लिहिणे. तसेच एकस्तर वेतनश्रेणी फरक तसेच कालबद्ध (१०/२०/३० वर्षाचा) पदोन्नती अदा करताना, फरक तक्त्यांबाबत सत्यता पडताळून न पाहणे इ.प्रकारचे गैरवर्तन करुन मोठया प्रमाणात शासकीय रकमेचा अपहार केलेचे निदर्शनास आलेले आहे. त्याबाबत संबधितांना पदावरून तात्पुरते दूर करण्यात येऊन त्यांचेबाबत विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

प्रस्तुत प्रकरणी मोठ्या प्रमाणातील शासकीय रकमेचा अपहार झालेल्या जि.प.आरोग्य विभागातील लेखा शाखेचे सेवार्थ प्रणाली संबधी काम पाहणारे श्री. घुले संतोष वामन हे तत्कालीन वेळी कनिष्ठ लेखाधिकारी, या पदावर कार्यरत होते व सबब श्री.घुले यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र- ब्राम्हणवाडा,मवेशी,शेंडी,कोहने ता.अकोले यांना पंचायत राज सेवार्थ प्रणालीतील लेवल-२ वरील बंद केलेला/असलेला Basic Arr.Tab वारंवार खुला करुन देतांना सदरचा Tab कोणत्या कारणास्तव हवा आहे याची कोणत्याही दस्तऐवजाची शहानिशा न करता आहरण व संवितरण अधिकारी यांची परवानगी न घेता परस्पर संबंधित प्राथमिक आरोग्य केंद्रांचे लिपिकांना त्यांचे म्हणनेनुसार संगणमताने उपलब्ध करुन दिल्याने संबंधित आरोग्य केंद्रातील लिपिकांना मोठ्या प्रमाणात शासकीय रकमेचा अपहार करण्यास वाव मिळाला. सबब श्री घुले यांनी नेमुण दिलेल्या कामकाजात अक्षम्य हलगर्जीपणा केलेला असल्याचे दिसून आलेले आहे.परिणामी श्री घुले यांची जबाबदारी निश्चित करणेकामी त्याचेविरुध्द संदर्भ क्रमांक ४ अन्वये दोषारोपपत्र बजावण्यात आलेले होते.

प्रस्तुत संदर्भ क्र.४ अन्वयेचे ज्ञापन दोषारोप श्री. घुले यांना बजाविण्यात आलेले आहे. व श्री.घुले यांना सदर दोषारोप पत्र प्राप्त झालेपासून १० दिवसाचे आत बचावाचे निवेदन सादर करणेबाबत फर्माविण्यात आलेले होते.

संदर्भ क्रमाक ५ अन्वये प्राप्त पत्रानुसार श्री.घुले यांनी सादर केलेले बचावाचे निवेदन इकडेस सादर करण्यात आलेले आहे. सदर बचावाचे निवेदनाप्रमाणे श्री.घुले यांनी त्यांचेविरुद्ध बजावणेत आलेले सर्व आरोप अमान्य केलेले आहेत.

त्यानुसार श्री. घुले यांनी त्यांचेविरुद्ध निश्चित केलेले सर्व आरोप अमान्य केलेले असल्याने श्री.संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती संगमनेर, जि.प. अहिल्यानगर यांचेविरुद्ध न्याय हक्काचे दृष्टीने विभागीय चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (३ (५) मधील तरतूदीनुसार खातेनिहाय विभागीय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. व सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी) आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करणेत येत आहे. विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागू राहतील.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजू मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणूनश्री.शिरोळे सुभाष वसंतराव,सहाय्यक प्रशासन अधिकारी आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे.त्याप्रमाणे संदर्भ ३ व ४ मध्ये नमूद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करून जिल्हा परिषदेची बाजू मांडावी, परिशिष्ट क्र. तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे.तसेच सोबत आवश्यक कागदपत्रांचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेताक क्रमाक २०२६१०१८०५००३३ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 18-10-2026 18:43:26
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद अहिल्यानगर**

**प्रति**

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी),नाशिक विभाग,नाशिक.
सोबत सबंधित प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते २५

२. श्री.शिरोळे सुभाष वसंतराव,सहाय्यक प्रशासन अधिकारी, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद अहिल्यानगर,
व्दारा व प्रत- जिल्हा आरोग्य अधिकारी,आरोग्य विभाग जिल्हा परिषद अहिल्यानगर
२/-सदर आदेशाची प्रत श्री. शिरोळे सुभाष वसंतराव,सहाय्यक प्रशासन अधिकारी,यांना बजावून दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी. सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते

३. श्री.संतोष वामन घुले, कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती, संगमनेर जि.प.अहिल्यानगर
व्दारा व प्रत-गट विकास अधिकारी,पंचायत समिती संगमनेर,जिल्हा परिषद अहिल्यानगर
२/-सदर आदेशाची प्रत श्री. संतोष वामन घुले,कनिष्ठ लेखाधिकारी, पंचायत समिती, संगमनेर जि.प.अहिल्यानगर यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.